**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर,
संपादक/वृत्तसंपादक

०७/०८/१५
( बाळासाहेब झोडगे )
सहायक जनता संपर्क अधिकारी
दूरध्वनी क्र.२२८१६६५६/२२८४१२५५

प्रसिध्दी पत्रक क्र.३०
दिनांक : ०७.०८.२०१५

- **शालेय विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध असलेल्या नियमित बसपास तसेच विशेष बसफे-यांवरील बसपास मुल्याचे सुसूत्रिकरण,**
- **वातानुकूलित बससेवांवर मुलांकरीता सवलतीचे प्रवासभाडे**
- **RF-ID स्मार्टकार्ड शिवाय रविवार व सार्वजनिक सुट्टी दिवशी दैनंदिन बसपासची सुविधा.**

मुंबई, ७ : सोमवार दिनांक १०.०८.२०१५ पासून शालेय विद्यार्थ्यांच्या नियमित बसपासचे व विशेष बसफे-यांकरीता आकारण्यात येत असलेल्या बसपास मूल्याचे सुसूत्रिकरण खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

**शालेय विद्यार्थ्यांच्या नियमित बसपासचे मूल्य**

| किलोमीटर्स | मासिक (रु.) | त्रैमासिक (रु.) | सहा महिन्याकरिता (रु.) |
|---|---|---|---|
| दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता | १५० | ४५० | ७५० |
| बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता | ३०० | ९०० | १५०० |

**शालेय विद्यार्थ्यांच्या विशेष बसफे-यांचे सहामाही बसपास मूल्य.**

| | |
|---|---|
| मनपा हद्दीतील शाळांसाठी १० कि.मी.पर्यंतची फेरी | रु.९००/- |
| मनपा हद्दीतील शाळांसाठी १० कि.मी. पेक्षा जास्त अंतराची फेरी | रु.१४००/- |
| मनपा हद्दीतील खाजगी शाळांसाठी १० कि.मी. पर्यंतची फेरी | रु.१०००/- |
| मनपा हद्दीबाहेरील खाजगी शाळांसाठी १० कि.मी. पेक्षा जास्त अंतराची फेरी | रु.१७००/- |
| बृमनपा हद्दीबाहेरील खाजगी शाळांसाठी १० कि.मी. पर्यंतची फेरी | रु.२०००/- |
| बृमनपा हद्दीबाहेरील खाजगी शाळांसाठी १० कि.मी. पेक्षा जास्त अंतराची फेरी | रु.२५००/- |

—२

रविवारी व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी प्रवास करणा-या प्रवाशांच्या सोयीकरिता दैनंदिन बसपाससोबत अनिवार्य असलेल्या **RFID स्मार्टकार्डची** अट सोमवार दिनांक १०.०८.२०१५ पासून शिथिल करण्यात आलेली आहे. यापुढे रविवार व सार्वजनिक सुट्टी दिवशी RFID स्मार्टकार्ड शिवाय प्रवासी दैनंदिन बसपासचा लाभ घेऊन, त्यांच्या इच्छित स्थळी प्रवास करु शकतील.

बेस्ट उपक्रमाच्या बससेवेमध्ये सद्यस्थितीत वातानुकूलित बससेवा वगळता सर्वसाधारण, मर्यादित आणि जलद कॉरीडॉर बससेवांवर १२ वर्षे वयापर्यंतच्या मुलांकरीता सवलतीचे प्रवासभाडे आकारण्यात येते. शनिवार, दिनांक ०८.०८.२०१५ पासून अन्य बससेवांप्रमाणेच वातानुकूलित बससेवांवर देखील १२ वर्षे वयापर्यंतच्या मुलांकरीता सवलतीचे प्रवासभाडे आकारण्यात येणार आहे.

**वातानुकूलित बससेवांवरील प्रौढ प्रवासभाडे व सवलतीचे प्रवासभाडे याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| कि.मी. | प्रौढ प्रवासभाडे (रु.) | सवलतीचे प्रवासभाडे (रु.) |
|---|---|---|
| २ | ३०.०० | १५.०० |
| ४ | ३५.०० | १५.०० |
| ६ | ५५.०० | २५.०० |
| १० | ६५.०० | ३०.०० |
| १४ | ८०.०० | ४०.०० |
| २० | १००.०० | ५०.०० |
| ३० | ११५.०० | ५५.०० |
| ४० | १४०.०० | ७०.०० |
| ५० | १६०.०० | ८०.०० |
| ६० | १८०.०० | ९०.०० |
| पुढील प्रत्येक १० कि.मी.च्या टप्प्याकरीता | २०.०० | १०.०० |

सर्व नागरिकांनी व बसप्रवाशांनी विशेषत: शालेय विद्यार्थ्यांनी सदर बदलांची नोंद घेऊन उपलब्ध केलेल्या सवलतीचा जास्तीत-जास्त लाभ घेऊन बेस्ट बसमधून प्रवास करावा असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात येत आहे.

---